# चला शोधूया वेगवेगळे आकार



रविवारी सगळे शेतावर गेले फिरायला,
फिरताना सांगितले होते भाजी गोळा करायला.

गाजरे आणली मोत्याने उकरून मऊ माती,
टोके त्यांची शंकू सारखी, हिरवी पाने वरती.

यशने आणली वांगी नि टोमॅटो लाल आंबट,
टोमॅटो छान गोल, पण वांगी जरा लांबट.

वेलीवरून रमाने तोडून आणल्या काकड्या,
काही दंडगोल, पण काही कमरेत वाकड्या.

झाडावर चढून गंपूने चिंचा आणल्या तोडून,
खुशीत परतली मनी, तिला सापडला लसूण.

बाबांनी केली भाजी, आईने केल्या भाकरी,
झाडाखाली जेवताना मजा आली भारी.





NXJMY6